REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा अभ्यास

श्रीमती. सुभेदार पी.पी.
सहाय्यक प्राध्यापक , शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई.

**सारांशः-**



सर्जनशीलता म्हणजे नवनिर्मितीक्षमता. ती वेगवेगळया प्रकारे व्यक्त होताना दिसते. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्य मते सर्जनशीलतेच्या माध्यमातून ज्ञानाचे रुपांतर संपत्तीत व समाजवस्तूत होते. सर्जनशीलता ही अनेक शोधांची जननी आहे. सर्जशीलता भारताच्या निर्मितीसाठी भारताची भावी पिढी सर्जनशील असणे महत्वाचे आहे. भारताची भावी पिढी म्हणजे शालेय विद्यार्थी सर्जनशील असणे महत्त्वाचे आहे. शिक्षणाचा विचार करता सामान्य मुलांकडे अधिक लक्ष दिले जाते. तर विशेष गरजा असणाऱ्या मुलांकडे तेवढे लक्ष दिले जात नाही. विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या प्रकारांपैकी एक प्रकार म्हणजे कर्णबधिरता या आव्हानात्मक प्रकारात सर्जनशीलता आढळते व याचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केलेला आहे.

**प्रस्तावनाः**

राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. देशाची उन्नती आणि समानता या दोन्हींसाठी शिक्षणावरील गुंतवणूक ही मनुष्यबळावरील गुंतवणूक आहे. कोणत्याही देशाच्या विकास प्रक्रीयेत मानवी भांडवलाची भूमिका महत्वाची आहे. मानवी भांडवलाचा विकास यामध्ये हे देशातील लोकांना कौशल्यप्राप्ती होणे, त्यांनी त्यांच्या क्षमतांचा वापर करुन नवनिर्मिती करणे या बाबी अपेक्षित आहेत. सर्वसामान्य बालके व विशेष गरजा असणारी बालके यांच्या क्षमता या वेगवेगळया आहेत. विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे जे अनेक प्रकार आहेत त्यापैकी एक म्हणजे कर्णबधिरत्व. एखाद्या व्यक्तीची श्रवणक्षमता कमी असेल व यामुळे व्यक्तीच्या दैनंदिन व्यवहारात अडथळा निर्माण होत असेल तर ती व्यक्ती कर्णबधिर समजली जाते. कानातील काही दोषांमुळे आवाजाच्या लहरी मेंदूतील श्रवणकेंद्रापर्यत पोहोचत नाहीत व त्यामुळे व्यक्तीला आवाजाचे ज्ञान होत नाही. याला कर्णबधिरता म्हणतात.

नीट ऐकू न आल्यामुळे बोलीभाषेत कर्णबधिर मुले कमी पडतात. कर्णबधिर मुलांचे अपंगत्व दुहेरी प्रकारचे असते. ऐकु येत नाही म्हणून बोलता येत नाही. ऐकण्याची क्षमता किती आहे हयावरुन ती व्यक्ती बहिरी आहे की नाही ते ठरवितात. ऐकण्याची क्षमता डेसिबल ;कइद्ध हया एककात मोजली जाते. २६ ते ४० डी.बी. हा सौम्य श्रवणदोष आहे. हयानंतर ४१ ते ५५ – डी.बी मध्यम, ५५ ते ७० डी.बी. मध्यम ते तीव्र, ७१ ते ९० डी. बी. तीव्र आणि ९० च्या पुढे अतितीव्र श्रवण दोष असतो.

बुद्धिमत्तेमध्ये विशिष्ट दिशेने विचार तर सर्जनशीलतेमध्ये विविध दिशांनी आढळते. कमी बुद्धिमान व्यक्तीही सर्जनशील असू शकते.

डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी भारताकडे एक विकसित व जगाचे नेतृत्व करणारा देश या दृष्टिकोनातून पाहिले आहे. त्यांच्या मते सर्जनशीलतेच्या माध्यमातून ज्ञानाचे रुपांतर संपत्तीत व समाजवस्तूत होते. त्यामुळे ज्यांच्याकडे सर्जनशीलता असते ते देश आर्थिक दृष्टया बलवान होतात व जगाचे नेतृत्व करतात. त्यामुळे कर्णबधिर विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आढळते का हे पाहणे औत्सुकयाचे ठरेल.

**संशोधनाची गरजः-**

प्रत्येक व्यक्तीचे समाजाशी अथवा आजूबाजूच्या जगाशी जे संबंध प्रस्थापित होतात जे भाषेमुळे. मनुष्य भाषा ऐकून शिकत असतो. ऐकू न येणारी व्यक्ती समाजाशी संबंध प्रस्थापित होण्यासाठी अयशस्वी ठरते. या मुलांमध्ये बौद्धिक दृष्टया उणीव असतेच असे नाही. ही मुले सर्व सामान्य मुलांप्रमाणेच असतात. ती देखील बुद्धिमान असतात. परंतु भाषेअभावी त्यांचा बौद्धिक विकास खुंटतो. त्यांना सहज ओळखणे कठीण जाते.

`कर्णबधिरता ही उणीव आहे. बोलक्या जगात तिथे संभाषण हे सर्व व्यवहाराचे प्रभावी माध्यम आहे. तिथे ती उणीव तीव्रतेने जाणवते. कर्णबधिर असलेली मुले स्वरयंत्रात दोष नसतानाही बालपणापासूनच्या श्रवणकमरतेमुळे मुकी झालेली असतात. शब्द व भाषा त्यांच्या कानावर सतत पडत नसल्याने आकलन लवकर होत नाही. कर्णबधिर हा आव्हानात्मक असा प्रकार आहे. त्यामुळे कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा शोध घेणे संशोधकास महत्त्वाचे वाटले.

**संशोधनाचा आढावाः-**

सर्जनशीलतेच्या संदर्भात झालेली बहुतांश संशोधने ही सामान्य मुलांच्या संदर्भात झालेली आढळतात. तसेच फिल्ड.(२००६) यांच्या संशोधनानुसार शिक्षकांमधील उच्च सर्जनशीलतेचा उपयोग विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता वाढीला लावण्यासाठी होतो. तसेच हॅकबर्ट आणि पीटर,एच्. (२०१०) हयांनी केलेल्या संशोधनानुसार सर्जनशीलता वाढीला लावण्यासाठी काही तंत्राचा वापर करता येतो. तसेच सर्जनशीलतेचा लिंगभेदावर परीणाम होतो का या संदर्भात संशोधकांमध्ये मतभिन्नता आढळते. बार, एस्. एस्. (१९८६) बिलकिणस्.एस्. (१९८८), देसाई , एन्.एन्. (१९९०), रेड्डी,एस्.वाय. (१९९०) आणि सिंग, आय्. (१९९०), वाशी, जी. (१९९२) यांच्या संशोधनानुसार सर्जनशीलते संदर्भात लिंगभेद आढळत नाहीत. तसेच मुस्ताफा, एम्. (२०१३) यांना असे आढळून आले की सर्जनशीलतेवर लिंगभेदाचा परीणाम होत नाही. म्हणून संशोधकाने या बाबींचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टयेः-**

१.कर्णबधिर मुलांचा अभ्यास करणे.
२.कर्णबधिर मुलांच्या सर्जनशीलतेचा अभ्यास करणे.

**व्याप्ती :-**

१. प्रस्तुत संशोधनामध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांपैकी कर्णबधिर बालकांचा अभ्यास केलेला आहे.
२. प्रस्तुत संशोधनात कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विचार केलला आहे.

**संशोधनाच्या मर्यादाः-**

१. प्रस्तुत संशोधन एका शाळेतील कर्णबधिर विद्यार्थ्यांपुरते मर्यादित होत आहे.

**संशोधन पद्धतीः-**प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला.

**संशोधनाची साधनेः–** संशोधनासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. कर्णबधिर शाळेतील सहा शिक्षक यांचेकडुन प्रश्नावली भरुन घेण्यात आली. सहजप्राप्त नमुना निवडीचा वापर करण्यात आला.तसेच निरीक्षण हया साधनांचा वापर करण्यात आला.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः–**

प्रश्नावलीतून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण करण्यात आले. त्यासाठी शेकडेवारीचा उपयोग करण्यात आला. त्यावरुन निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष :–**

कर्णबधिर मुलांच्या सर्जनशीलतेविषयी काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

१. कर्णबधिर मुलांच्या बुद्ध्यांकाची मर्यादा याचा विचार करता त्यांचा बुद्धांक सामान्य असल्याचा दिसतो. तसेच त्यांच्या शाळेतील बसण्याची व्यवस्था राऊंड टेबल भोवती असते. जास्त श्रवण ऱ्हास असणारे विद्यार्थी बैठकव्यवस्था शिक्षकाजवळ व कमी श्रवणऱ्हास असणारे विद्यार्थी बैठकव्यवस्था शिक्षकापासून दूर केलेली असते. त्यामुळे शिक्षकाचे हावभाव, ओठाच्या हालचाली स्पष्टपणे दिसतात. तसेच आवाज ऐकु येण्यास सहाय्य होते.

२. कर्णबधिर मुलांच्या संदर्भात बालवर्ग व पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणाऱ्या राख्या तयार करणे, चित्र काढणे, नृत्य करणे, भेटकार्ड तयार करणे या कृती करवून घेतल्या जातात. तर दुसरी, तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्याकडुन वरील कृतीखेरीज पणत्या तयार करणे, मेणबत्या तयार करणे, उटणे तयार करणे, हया कृती तयार करवून घेतल्या जातात.

३. सर्वच म्हणजे १००% शिक्षकांच्या मते विद्यार्थी स्वतःच्या कल्पना वापरुन त्यामध्ये बदल करतात. हा बदल मुले व मुली दोघांमध्ये समान दिसतो. दोघांमध्ये सारख्या प्रमाणात आढळतो.

४. १००% शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना शाबासकी दिली जाते. चांदण्या दिल्या जातात.

५. शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलमेमध्ये वाढ करण्यासाठी मुलांची आवड कशात आहे हे त्यांनी ओळखले पाहिजे. त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच मुलांना विशिष्टि वेळापत्रकात बंद न ठेवता त्यांना सर्जनशीलतेसाठी योग्य वेळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

६. सर्जनशीलतेमध्ये वाढ करण्यासाी प्रात्यक्षिके दाखविणे, नेटवरचे व्हिडीओ दाखविणे, वेगळया अध्यापन पद्धतींचा उपयोग करणे यांचा वापर करायला हवा असे शिक्षकांना वाटते.

एकंदरीत असे लक्षात येते की सामान्य मुले व विशेष गरजा असणारी मुले यांच्या सर्जनशीलतेमध्ये फरक आहे.

**संदर्भ :–**

1. Best,J.W. and Khan, J.W.(2003). Research in Education), (9th Edition), New Delhi, Prentic-Hall of India.
2. BAR, S.S. (1986). Fouth survey of Research in Education, VOI I (pp 485) New Delhi: NCERT.
3. Bilques,S.(1988) Fourth survey of Education Research VOL II (pp 1088), New Delhi:NCERT.
4. Desai, N.N. (1987). Fifth survey of Education Research VOI I. (pp489) New Delhi:NCERT
5. Reddy; & Sudhakara, Y. (1990). Survey of Educational Research. (PP 1064) New Delhi: NCERT.

६. मराठे, म.ग. (२००५) समावेशक शिक्षण– शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर, म. रा. शै. स. व प्र. परीषद . पुणे.